# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/10/2023 (रविवार) दुपार

## घरफोडी

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा वाकेश्वर शिवार येथे दिनांक ०६/१०/२०२३ चे १२.०० वा. दुपारी ते दि. ०७/१०/२०२३ ला दुपारी १२/३० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– सिताराम नामदेव आकरे रा. नांदगाव ता. मौदा जि. नागपूर हे घरी हजर असतांना त्यांचे राईस मिलचे दिवानजी नामे–अरुण श्यामराव वैद्य, रा. खरडा यांनी फिर्यादीला फोन करुन राईस मिलचे शटरचे लॉंक तुटले असुन शटर उघडे आहेत असे सांगीतल्याने फिर्यादी लगेच राईस मिलमध्ये आले असता अरुण वैद्य हे राईस मिल समोर हजर होते राईस मिलचे शटरचे लॉंक तुटलेले व शटर उघडे असल्याचे दिसल्याने दोघांनी राईस मिलमध्ये जाउन पाहीले असता राईस मिलच्या मशीनला लागलेले व राईस मिलमध्ये असलेले १) ४० एच. पी. चे मोटार (क्रॉंम्पटन ग्रिवज) –२ नग प्रती कींमती–१०,०००/– रुपये एकुण २०,०००/–रुपये २) १५ एच. पी. चे मोटार (चायना सेलर) –१ नग किंमती–५,०००/– रुपये ३) १० एच. पी. चे मोटार (रबर सेलर) –१ नग किंमती–५,०००/–रुपये ४) ३ एच. पी. चे मोटार (सेम्टेयर) –३ नग प्रती किंमती–२,०००/– असा एकुण किंमती ६०००/–रुपये ५) २ एच. पी. चे मोटार (डीस्टोनर) –२ नग प्रती किंमती–२,०००/–रुपये असा एकुण किंमती ४०००/–रुपये ६) १ एच पी मोटर (एफ आर के) १ नग किंमती २०००/–रुपये ७) २ एच पी मोटर (सिप्टर) १ नग २०००/– रुपये अशा एकुण ११ मोटर सर्व मोटारीची एकुण किंमती ४४०००/– रुपयाचा मुद्देमाल तसेच ८) १ लोखंडी काटा स्टॅंन्ड किंमती ४०००/– रुपये ९) २ ईलेक्ट्रीक काटे प्रती ४०००/– किंमती याप्रमाणे एकुण ८०००/–रुपये १०) तसेच एकुण वेगवेगळया वजनाचे एकुण १२ वजन (बट) एकुण किंमती ५०००/–रुपये असा संपुर्ण एकुण ६१०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक संदिप बाजनघाटे मो. क्र. ९५६१०३४२८७ हे करीत आहे.

## मोटारपंप चोरी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील हिवरा शेत शिवार येथे दिनांक ०६/१०/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक ०७/१०/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अरून मानिक फुले, वय ५० वर्ष रा. हिवरा यांनी नहरात धानाला लावलेली मोटारपंप शेतात पाणी सुरू करून फिर्यादी हा घरी निघुन गेला असता दिनांक ७/१०/२०२३ चे सकाळी ७/०० वा. शेतात जावुन पाहीले असता त्यांच्या नहराला धानाला लावलेली मोटार विराट कंपनीचा 3 HP ची किमंती ८,०००/रू ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मेश्राम पोस्टे कन्हान हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर